**नाशिक महानगरपालिकेतील अग्निशमन विभागातील अग्निशामक (फायरमन) या पदाची शैक्षणिक अर्हता निश्चित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक नामपा-२०२१/प्र.क्र.२२५/नवि-२५**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ०५ डिसेंबर, २०२५

**संदर्भ** :- १) समक्रमांकित शासन निर्णय, दि.०५ जानेवारी,२०२२.
२) आयुक्त,नाशिक महानगरपालिका यांचे जा.क्र./आस्था/वशि/कार्या-१०/५२/२०२५, दि.०३ नोव्हेंबर,२०२५
३) नगर विकास विभाग, पत्र क्र.अशसे-२०२४/प्र.क्र.१२८/नवि-१४, दि.१२ जून, २०२५.
४) नगर विकास विभाग, क्र.संकीर्ण-२०२५/सं.क्र.७२९/नवि-२५, दि.१४ जून, २०२५.

**प्रस्तावना :-**

राज्यातील (बृहन्मुंबई मनपा वगळता) महानगरपालिकांमधील विविध संवर्गातील पदांच्या आदर्श सामाईक सेवा प्रवेश नियमांमध्ये एकसमानता नसल्याचे विचारात घेऊन, सामाईक सेवा प्रवेश नियम तयार करण्यासाठी दिनांक ०९.१२.२०२४ च्या शासन परिपत्रकान्वये समिती गठीत करण्यात आली आहे.

तथापि, वर नमुद केल्याप्रमाणे अग्निशमन संवर्गाच्या पदांचे सामाईक सेवा प्रवेश नियम तातडीने करण्याची गरज विचारात घेता, संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, मुंबई यांनी महानगरपालिकांमधील अग्निशमन संवर्गातील पदांची कर्तव्य व जबाबदाऱ्या विचारात घेऊन, या पदांकरीता आदर्श सामाईक सेवा प्रवेश नियमाचा प्रारुप मसूदा शासनास सादर करण्यात आला होता. अग्निशमन संवर्गाच्या सदर आदर्श सामाईक सेवा प्रवेश नियमास शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुषंगाने दि.१२.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अग्निशमन संवर्गातील पदांकरीता आदर्श सामाईक सेवा प्रवेश नियमाचा मसुदा सर्व महानगरपालिका यांना लागू करुन त्यानुषंगाने सेवा प्रवेश नियमात सुधारणा करण्यात यावी. असे आदेशित करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने, संदर्भाधीन पत्र क्रमांक ४ अन्वये नाशिक विभागातील सर्व महानगरपालिकांना सामाईक अग्निशमन सेवा प्रवेश नियमांत सुधारणा करण्याबाबत आवश्यक ती उचित कार्यवाही करण्याचे सूचित करण्यात आले आहे.

त्यानुसार नाशिक महानगरपालिकेच्या अग्निशामक विभागाच्या प्रस्तावित सेवा प्रवेश नियमातील अग्निशामक (फायरमन) या पदाच्या शैक्षणिक अर्हतेत सेवा प्रवेश नियमात दुरुस्ती करण्याबाबत आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी उक्त संदर्भक्रमांक २ अन्वये विनंती केली आहे. त्यास नाशिक महानगरपालिका महासभेने ठराव क्रमांक ४२२, दिनांक १४.१०.२०२५ अन्वये मंजुरी

दिली आहे. उक्त संदर्भाधीन पत्र क्रमांक १ अन्वये नाशिक महानगरपालिकेतील अग्निशामक या पदाची यापूर्वी निश्चित करण्यात आलेली शैक्षणिक अर्हता या शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात येत असून, दि.१२.०६.२०२५ रोजी निर्गमित शासन पत्राप्रमाणे आदर्श सामाईक सेवाप्रवेश नियमास अनुसरुन पुढील प्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

नाशिक महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील अग्निशामक (फायरमन) या पदावरील नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता निश्चित करण्यात येत आहे.

| पदनाम | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|
| अग्निशामक (विमोचक)<br>एस - ६ ( गट - क)<br>(१९९००-६३२००) | **नामनिर्देशन -**<br>अग्निशामक -विमोचक, - गट-क या पदावरील नियुक्ती या पुढील मार्गाने करण्यात येतील,- आयोग/निवडसमिती यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षेच्या निकाला आधारे शिफारस करण्यात आलेल्या व खालील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशाद्वारे<br>(i) वयोमर्यादाः<br>(१) किमान वयोमर्यादा १८ वर्षे पूर्ण.<br>(२) कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी वयाच्या २८ वर्षापेक्षा कमी व मागासवर्गीय प्रवर्गातील व्यक्तींसाठी ३३ वर्षापेक्षा कमी<br>(ii) शैक्षणिक पात्रता :<br>माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण आणि अग्निशामक प्रशिक्षण पाठ्यक्रम उत्तीर्ण आणि हलके वाहन चालविण्याचा वैध परवाना ही अर्हता धारण करीत असलेली व्यक्ती.<br><br>(iii) शारिरीक अर्हताः<br>(१) उंची : किमान १६५ सेंटीमीटर (पुरुष) व किमान १५७ सेंटीमीटर (महिला)<br>(२) वजन : किमान ५० किलोग्रॅम (पुरुष) व किमान ४६ किलोग्रॅम (महिला)<br>(३) छाती : किमान ८१ सें.मी (साधारण) व किमान ८६ सें.मी (फुगवल्यानंतर)<br>(महिला उमेदवारांसाठी लागू नाही)<br>(४) दृष्टी : ६/६ (चष्मा शिवाय) |

०२.  सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२५१२०५१३४३०२१९२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

AJINKYA VASANT BAGADE

Digitally signed by AJINKYA VASANT BAGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Urban Development Department, 2.5.4.20=c2c536d8c69638eb0722b58787e3271291abd492dd102db87dd9f19890bb74ce, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6c08d792cf36e8c4debdaff51291af7fa70ad1cabea48c176da37b5a461cb674, cn=AJINKYA VASANT BAGADE
Date: 2025.12.05 13:44:00 +05'30'

**(अजिंक्य बगाडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक
२) निवडनस्ती (नवि-२५)